**सन -२०२२**

१) रेपोस्टे बडनेरा ०६/२०२२ कलम ३०६,३४ भादंवि सहकलम ३ (r),(s) व ३(२),(५) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा

दिनांक २१.१२.२१ रोजी २१.५५ वा. सुमारास फिर्यादी नामे सतिश नामदेवराव तायवाडे, वय ४१ वर्ष, व्यवसाय मजुरी, राह. ग्राम सुरळी, ता. वरूड, जि. अमरावती मो नं. ७२६३०४९६९४ यांचा मुलगा रे.स्टे. वरूड येथील प्लॅटफार्म नं. ०१ वर नरखेड साईडला कोणते तरी विष घेवून मयत झाला वरून रेपोस्टे बडनेरा येथे मर्ग क्र. २३/२०२१ कलम १७४ जाफौ प्रमाणे दाखल करण्यात आला असून फिर्यादी यांनी लेखी रिपोर्ट दिली की, दिनांक २१.१२.२०२१ रोजी संध्याकाळी त्यांचे भाव-सासरे विनोद रमेशराव लोखंडे यांचा फोन आला व सांगीतले की, रे.स्टे. वरूड येथील प्लॅटफार्म नं. ०१ वर नरखेड साईडला बेंचवर त्यांचा मुलगा नामे महेश उर्फ बंटी उर्फ करण तायवाडे, वय २१ वर्ष, हा पडून आहे. असे सांगीतल्यावरून त्यांची पत्नी व ते घटनास्थळावर पोहचल्यानंतर त्यांना खात्री झाली की, तो त्यांचाच मोठा मुलगा आहे व त्याचे बाजुला एक लिओसीन प्लॅन्ट ग्रोथ रेगुलेटर कंपनीची विषारी बॉटल व त्याचा मोबाईल पडून होता तसेच रेल्वे स्टेशनवर अंकीत बारस्कर याची गाडी क्रमांक MH-२७ BY २७२७ काळया रंगाची गाडी उभी होती. त्यास पोलीसांनी ग्रामीण रुग्णालय वरूड येथे नेले असता तेथील डॉक्टर यांनी त्यास तपासून मरण पावल्याचे सांगितले. बंटी हा वरुड येथे त्याचा जवळचा मित्र अंकीत ओंकारराव बारस्कर, राह. वरूड याचे सह मागील एक वर्षापासून किरायाने राहत होता. ते काय काम करीत होते याबाबत त्यांना काही माहित नाही. त्यांनी अंकीतला विचारले असता त्यांने सांगीतले की, ते प्लॉट, रेतीचा, दलालीचा व्यवसाय मागील एक वर्षापासून करीत आहे.

घटने दिवशी फिर्यादी यांचे बंटी सोबत दोनदा बोलने झाले तर तो कोणत्यातरी त्रासात असल्याबाबत मला त्याचे बोलण्यावरून जाणवत होते. त्यांनी त्याला विचारले तर त्याने काही सांगीतले नाही. त्यांनी दुपारी दोन वाजताचे नंतर त्याला फोन केला असता लागला नाही. घटनेदिवशी दि. २१.१२.२०२१ रोजी त्यांचा पुतण्या लखन संजय तेलंगे, अर्जुन भिमराव गायकवाड, रवी रंगलाल सर्रेआम हे वरुड येथील किरायाचे घरात हजर असतांना अंकीत बारस्कर हा घरात येवून त्यांचे जवळ "मांगटया पोंगटयाहो इथ हरामाच खाउन तुम्ही माजले काय, मी येवढी मोठी सर्कस चालवितो येऊ दे त्याले करण मांगटया पोंगटयाले साल्याले एका मिंटात तुम्हाले हाकलतो" आहे. असा बोलल्याचे फिर्यादीला लखन ने फोन करून सांगीतले. यावरून आरोपी नामे १) अंकीत ओंकारराव बारस्कर, वय २९ वर्ष, राह. साई सृष्टी कॉलनी, वरूड, जि. अमरावती, २) हर्षद लिलाधरराव गांजरे, वय २४ वर्ष, राह. रूप कॉलनी वरूड, जि. अमरामवती, ३) तेजस सुरेशराव शिरभाते, वय २४ वर्ष, राह. महेश रेडीमेड जवळ, मेन रोड, वरूड, जि. अमरावती (अटक ता. वेळ १३.०१.२०२२ चे २१.३० वा.) व ४. गुरूदत्त रूपराव वरूडकर, वय २९ वर्ष, राह. जागृत कॉलनी रिंगरोड, वरूड, जि. अमरावती ( क्र. १,२ व ४ अटक ता. वेळ १४.०१.२०२२ चे १४.१८ वा.) सर्वांची जात कुणबी हे नेहमी बंटीच्या संपर्कात राहत होते. त्यांनी फिर्यादी यांचा मोठा मुलगा बंटी ऊर्फ करण तायवाडे याला कोणतातरी मानसीक त्रास देवून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे यातील नमूद आरोपींच्या त्रासाला कटाळून त्यांचे मुलाने आत्महत्या केली. फिर्यादी यांनी दिले तक्रारी वरून दिनांक १२.०१.२२ रोजीचे १९.५७ वा. गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयात दिनांक १८.०१.२०२२ रोजी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदया अन्वये कलम वाढ करण्यात आली असल्याने गुन्हयाचा तपास श्री. अनंत तारगे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग अकोला यांनी केला असून अटक आरोपी विरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र क्र. १२/२२ दिनांक १४.०३.२२ अन्वये सादर करण्यात आले असून सीसी नं. ७५/२२ दिनांक १४.०३.२२ असा प्राप्त झालेला आहे.

२) रेपोस्टे बडनेरा १२२/२२ कलम ३०६,५०६ भादंवि सहकलम ३ (२) (५) व (२)(५ए) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारणा) अधिनियम १९८९

दिनांक ०६.०६.२२ रोजीचे ११.२० वा. पुर्वी रेल्वे स्टेशन बडनेरा डाऊन लुप लाईन स्टार्ट सिग्नलचे पुर्वी कि. मी. ६६३/१२-१४ अज्ञात गाडीचा खाली येवून घनश्याम उर्फ बच्चन कालीचरण मारवे, वय ५५ वर्ष, राह. जुनीवस्ती बडनेरा, जि. अमरावती यानी आत्महत्या केली. त्यावरून पो.स्टे.ला अ.मृ.क्र. ०८/२०२२ कलम १७४ जा.फौ. अन्वये दि. ०६.०६.२०२२ रोजी दाखल असून सदर मयताच्या खिशयामध्ये सुसाईड नोट मिळाल्याने तसेच (मृतकाचा मुलगा) फिर्यादी नामे दुर्गेश घनश्याम मारवे, वय २३ वर्ष, धंदा मजुरी, राह. जुनीवस्ती बडनेरा, जि. अमरावती मो. नं. ९१७५६२२१६६ यांनी फिर्याद दिली की, यातील मयत इसम नामे घनश्याम उर्फ बच्चन कालीचरण मारवे, वय ५५ वर्ष, राह. जुनी वस्ती बडनेरा, जि. अमरावती, हे त्यांचे वडील असून त्यांचे वडीलाच्या नावावर दोन वर्ष आधी घरकुल मंजूर झाले. त्यांचे घराचे घरकुल मंजुर करण्याचे काम हरी ऊर्फ विशाल तुमरे यानी करून दिले. त्यात पहिला चेक एक लाख पंचवीस हजाराचा आला त्यामधून हरी यांनी पन्नास हजार स्वतः जवळ ठेवले तसेच दुसरा चेक एक लाख पंचवीस हजाराचा मंजुर होवून आला परंतु सदर हरी तुमरे यांनी दिला नाही. वारंवार फिर्यादी यांचे वडील त्याचेकडे जावुन घर बांधणेबाबत विचारत असता, हरी तुमरे हा फिर्यादी यांचे वडीलांना "तुम्हारे को पैस वापस देता नही और तुम्हारा घर भी बांधकर देता नही मैने तुमारी स्टॅम्प पर सही लिया है, तुम्हारे से जो करना है, कर लो और मेरे नाम का रिपोर्ट दे दो मेरा कुछ भी हो नही सकता " असे म्हणत असल्याने व जिवे मारण्याची धमकी देत असल्याने फिर्यादीचे वडील नेहमी मानसिक तणावात राहत होते. अटक आरोपी नामे हरी ऊर्फ विशाल सुखदेवराव तुमरे, वय ३९ वर्ष, राह. जुनी वस्ती, संजीवनी कॉलनी, बडनेरा, जि. अमरावती (अटक ता. ०७.०६.२०२२ वेळ ००.५१ वा.) यांचे मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे व त्याचे मरणास नमुद आरोपी कारणीभूत असल्याचे मिळालेल्या सुसाईड नोटमध्ये लिहल्याने फिर्यादी यांचे वडीलास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले बाबत फिर्यादी यांनी फिर्याद दिले वरून दिनांक ०६.०६.२०२२ चे १९.५० वा. गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सपोनि/श्री. चाफले हे करीत आहेत.

सदर गुन्हयामध्ये मृतक हा अनुसूचित जातीतील मेहतर समाजाचे असून आरोपी हा इतर मागास प्रवर्गातील कुणबी जातीचा असून सदर गुन्हयामध्ये १० वर्षापेक्षा जास्त शिक्षा असल्याने कलम ३ (२) (५) तसेच आरोपीने मृतकास मारण्याची धमकी दिल्याने कलम ५०६ भादंवि समाविष्ट असल्याने कलम ३(२)(५ए) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध सुधारणा) अधिनियम १९८९ अन्वये दिनांक ०५.०९.२२ रोजी १९.४३ वा. स्टे. डा. नोंद क्र. २७/२२ अन्वये कलमवाढ करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयात अटक आरोपी विरूध्द मा. विशेष सत्र न्यायालय, अमरावती येथे दोषारोपपत्र क्र. ७६/२२ दिनांक २८.११.२२ अन्वये सादर करण्यात आले असून आरसीसी क्र. ३५८/२०२२ दिनांक २८.११.२२ असा प्राप्त आहे.